Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV Marathi Part - II October - December - 2018

**Peer Reviewed Referred**
**and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2018 - 5.5**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖
**Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

# ६. महिला पोलिस आणि लिंगभाव

**प्रा. काळे आर. बी.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.
**प्रा. मोकासरे जी. टी.**
समाजशास्त्र विभाग प्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव.

**प्रस्तावना**

पोलिस संघटन हे समाजातील महत्वाचे संघटन आहे. समाजव्यवस्थेत नियंत्रण ठेवण्यासाठी ती प्रभावीपणे काम करते. त्यामुळे समाजव्यवस्थेत शांतता टिकवून ठेवली जाते व समाजव्यवस्था स्थिर राहण्याला मदत होते. आजच्या आधुनिक समाजव्यवस्थेत तर पोलिस व्यवस्थेचे महत्व दिवसेंन दिवस वाढत चालले आहे. गुन्हेगारीचे वाढते प्रमाण, संघटित गुन्हेगार, आतंकवाद, सायबर क्राईम यामुळे पोलीस व्यवस्थेलाही आपले पारंपारिक स्वरुप बदलून आधुनिकतेची कास धरावी लागली आहे. परंतु आजही आपला समाज व पोलिस व्यवस्था मात्र महिला पोलिसांच्या बाबतीत फारशी उदार झालेली दिसत नाही. महिला पोलिसांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन बदललेला नाही. आजही पोलिस व्यवस्था पुरुष प्रभावी (Male dominant) म्हणून ओळखली जाते.

महिला पोलिसांचा जागतिक इतिहास बघितला असता असे दिसून येते की, 1845 मध्ये न्युयॉर्क येथे महिला, मुली, बालकांच्या समस्या व प्रश्न सोडवण्यासाठी Women Matron ची नियुक्ती करण्यात आली. तुरुंगातील महिला बालके यांच्यावर देखरेख ठेवणे हे त्यांचे काम होते. पुढे 1903 ला महिला पोलीसांची नियुक्ती ऑफीसियली दृष्टीकोनातून Stuttgart (Fedaral Republic of Germany) येथे करण्यात आली.[1] भारतात 1938 ला कानपूर येथे झालेल्या कामगार संपात महिला कामगार मोठया प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. या संपावर नियंत्रण ठेवताना संपातील महिलांवर नियंत्रण ठेवणे पोलीसांना अशक्य झाले होते. करीता पुढे अशी समस्या परत निर्माण होऊ नये म्हणून 1939 ला भारतातील पहिल्या महिला पोलीसांची नियुक्ती करण्यात आली.[2]

**उद्देश**

1. महिला पोलिसांच्या संदर्भात होणारा लिंगभेदभाव जाणून घेणे.
2. पोलिस व्यवस्थेतील लिंगभाव संपवण्यासाठी उपाय सुचवणे.

**अध्ययन पध्दती**

सदरील पेपर तयार करण्यासाठी द्वितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला असून संदर्भग्रंथ, शोधप्रबंध, विविध मासिके व इंटरनेट वरील माहिती या स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे.



Scanned by CamScanner

महिला पोलिस आणि लिंगभाव

लिंगभाव

लिंगभाव ही एक सामाजिक संकल्पना असून तीच्यामध्ये समाजात होणाऱ्या स्त्री पुरुषांच्या भेदभावाचा निर्देश होतो. लिंगभाव ही संकल्पना सर्वप्रथम मांडणारी स्त्रीवादी विचारवंत ॲन ओकले यांच्या मते लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे त्यातून स्त्री व पुरुषांची बाईपणात व पुरुषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सुचीत होते. एखादी व्यक्ती ही स्त्री किंवा पुरुष हे जैविक पुराव्याने ठरते, तर व्यक्तीचे ।

भारतातील पोलिस व्यवस्थेमधील स्त्री पुरुष भेदभाव हा त्यांच्या संख्येवरूनच लक्षात येतो. आज जागतिक तुलनेत भारतातील महिला पोलिसांचे प्रमाण खुप कमी आहे. सन 2000 मध्ये चीनमध्ये महिला पोलिसांचे प्रमाण 11. 25% होते, स्वीडन मध्ये 17.03%, इस्टोनियात 26%, सिंगापूरमध्ये 19.1%, साऊथ आफ्रिका 21.4%, नेदरलँडमध्ये 17. 1% आणि भारतात केवळ 2.2% एवढेच होते.[3] Bureau of Police Research and Development (२०१५) च्या अहवाला नुसार भारतात 01.01.2015 ला 17,21,101 एकुण पोलीसांपैकी 1,10,872 एवढ्या महिला पोलिस होत्या त्यांचे शेकडा प्रमाण केवळ 6.44% होते.

भारतातील महिला पोलीसांचे आकडे बघितल्यावरच असे दिसून येते की, पोलिस व्यवस्थेत स्त्री–पुरुष असमानता आहे. कारण आजही भारतात महिला पोलिसांचे प्रमाण केवळ 6.44% आहे. स्त्री–पुरुष जर एकाच नाण्याच्या दोन बाजु असतील तर त्यांचे प्रमाण समान असायला हवे. कमीत कमी सरकारी नियमाप्रमाणे 33% तरी असायला हवे परंतु सदरील प्रमाण खुपच कमी आहे.

महिला पोलिसांचा दर्जा सुध्दा हा पुरुष पोलीसांपेक्षा निम्न असल्याचे बरेच ठिकाणी दिसून येते. ओम राज सिंह बिश्नोइ यांनी केलेल्या दिल्ली येथील महिला पोलीसांच्या (1999) अभ्यासात असे दिसून आले की, 61 टक्के महिला पोलिस त्यांचा दर्जा हा पुरुष पोलिसांपेक्षा निम्न असल्याचा मान्य करतात.

आजही आधुनिक भारतात खुप कमी महिला अशा आहेत की, ज्यांना पोलिस क्षेत्रात करीअर करायचे आहे. आजही सर्वाधिक महिला केवळ नोकरी लागावी, उपजिवीकेचे साधन म्हणून काही महिला आज या क्षेत्रात येत आहे. याशिवाय असे खुपच कमी पालक आहेत ज्यांना असे वाटते की, आपल्या मुलींनी पोलीस क्षेत्रात करीअर करावे. उलट ज्यामुलींना या क्षेत्रात करीअर करायचे आहे अशा मुलींना विरोध होतो. कारण समाजात असा अनुभव आहे की, पोलिस व वकील मुलींशी विवाह करण्यास मुले तयार होत नाहित.

रानु सिन्हा यांनी भारत व अमेरिकेतील महिला पोलिसांचा तुलनात्मक अभ्यास केला (2003) त्यात त्यांना असे आढळून आले की, भारतात 16 टक्के महिला पोलीसांचा लैंगिक छळ होतो, तर अमेरिकेत 20 टक्के महिला पोलिसांचा लैंगिक छळ होतो. परंतु भारतात महिला पोलीसांच्या संदर्भात लिंगभेदभाव अधिक प्रमाणात होतो. भारतात 42 टक्के महिला तर अमेरिकेत 24 टक्के महिलांना लिंगभेदभावाचा त्रास होतो.

भारतीय महिला पोलीस विशेषतः शिपाई यांना काम देतांना त्यांना काही काम देतच नाही, महत्वाचे कामे ते करु शकत नाही किंवा पुरुष प्रमाणे त्या काम करु शकत नाही असे टोमने ऐकावला मिळतात. त्यामुळे महिला पोलिसांना वरीष्ठांकडून भेदभाईऽवही केले जाते.



Scanned by CamScanner

भारतीय महिला पोलीसांच्या संदर्भातील महत्वाचा प्रश्न म्हणजे त्यांच्या कामाच्या ठिकाणी असलेल्या सोयी सुविधांचा अभाव होय. अनेक ठिकाणी महिला पोलीसांसाठी स्वतंत्र शौचालये नसतात त्यांना कामाच्या ठिकाणी चेंजिंग रूम ची व्यवस्था नसते. एवढेच नव्हे तर बाहेरगावी दौऱ्यात जर ड्युटी लागली तर शौचालयाच्या व रात्रीच्या वस्तीकरताना अगदी अडचणींना सामोरे जावे लागते.

Rough Road to Equality -Women Police in South Asia-2015 या अभ्यासानुसार आशियातील महिला पोलिसांसमोरील प्रमुख आव्हानांमध्ये पुरुष प्रभावी संस्कृती, कामाच्या ठिकाणी होणारा अन्याय, लिंगभेदामुळे मूलभूत सोयी सुविधांचा अभाव यांसारख्या आव्हानांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. म्हणजेच भारतातच नव्हे तर संपूर्ण आशियातील महिला पोलीसांना लिंगभेदाचा सामना करावा लागत आहे. महिला पोलिसांना केवळ कार्यालयात भेदभावाला सामोरे जावे लागते असे नाही तर भारतीय समाजात सुध्दा त्यांच्या बद्दल सकारात्मक वातावरण नाही. कारण अनेक संशोधनात असे दिसून आले आहे की, पोलीसांचे काम हे महिलांचे नाही ते काम महिला चांगल्या प्रकारे करु शकत नाही अशीच जनमानसाची धारणा आहे त्यामुळे समाजाचा त्यांना पूर्णतः चांगला पाठींबा मिळत नाही.

याशिवाय शमिम अली यांना Women police and Social change 1889 यांना आपल्या कर्नाटकमधील संशोधनात असे आढळून आले की, बहुतांश महिलांना त्यांच्या सर्विसमध्ये प्रमोशनच्या संधी मिळाल्या नाहित. तसेच प्रतिमा रिझवी यांनी आपल्या रिसर्च पेपर Challenges for Women in Indian Police System (2015) मध्ये असे स्पष्ट केले आहे की, आजही पुरुष पोलिस सहकारी महिला पोलिसांना एक पोलिस म्हणून स्वीकारायला तयार नाहीत. यावरुन पुरुषांची हिन मानसिकता दिसून येते.

**सारांश**

पोलीस संघटन हे समाजातील एक महत्वाचे संघटन असून सामाजिक नियंत्रणाचे महत्वाचे काम ते करत त्यामुळे समाजात शांतता प्रस्थापित होण्यास मदत होते. अशा महत्वाच्या क्षेत्रात महिलांना समान प्रतिनिधीत्व असायला हवे. परंतु आजच्या 21 व्या शतकात सुध्दा भारतासारख्या विकसनशील देशात महिला पोलिसांचे प्रमाण हे केवळ 6.44 टक्के आहे. ही देशासाठी लाजीरवाणी बाब आहे. आजही पोलिस क्षेत्र हे Mail Dominant क्षेत्र म्हणून ओळखले जाते. यामध्ये बदल होणे ही काळाची गरज आहे. याशिवाय आहे त्या महिला पोलिसांना केवळ महिला आहे म्हणून लिंगभेदाचा सामना करावा लागतो. मुळात पोलिस हे क्षेत्र महिलांच्या सक्षमीकरणासाठी उत्तम क्षेत्र आहे मात्र तेथेच महिलांचा भेदभाव होणे हे सुध्दा एक स्वार्थी पुरुषी मानसिकतेचे लक्षण आहे. महिला पोलिसांचे प्रमाण कमी असणे, सहकारी पुरुषांकडून होणारा भेदभाव, वरिष्ठांचे वर्तन, प्रमोशनच्या अडचणी, कामाच्या ठिकाणचे लैंगिक शोषण, कामाच्या ठिकाणी असलेल्या सोयी सुविधांचा अभाव हे पोलिस व्यवस्थेतील लिंगभेदाचे प्रमुख घटक आहेत.

जोपर्यंत समाजामध्ये आपण महिलांना सन्मानाचे समान स्थान प्राप्त करुन देत नाही, तोपर्यंत समाज विकसित होऊ शकत नाही. त्यामुळे पोलिस व्यवस्थेतही महिलांचे प्रमाण वाढवून, त्यांना समान संधी देवून, त्यांच्या क्षमताशक्तीचा आपण योग्य प्रकारे वापर करुन घेतला पाहिजे. त्यांच्या अडचणी समजून घेवून आपण त्यांचा व देशाचाही विकास करु शकतो.



Scanned by CamScanner

संदर्भ सूची

1. Dr. Mahajan Amarjit, 'Indian Policewomen', Page-35, Deep& Deep Publications, New Delhi,1982.
2. Dr. Vishnoi, Omraj Singh, 'Women Police in India', Page- 40, Arwali Publication New Delhi,1999.
3. Mangai Natarajan, Women Police in a Changing Society, Page-34,AshgatePublising, Hampshire,England.(2008)

**Other Referances**

1. Jyoti Pote, Mumbaitil Mahila Polisanchya Bhumik aani Tantanav Yancha Samajshastriy Abhayas, Thesis Shumitted to N.D.D.W.U.-Oct-2013.
2. Khadijah H.Nasser, 'Policewomen status in the Police Department and Their role in Protecting Women from Violence' Published by United Nations Educational Scientific and Cultural Organization-2009.
3. Report of BPRD, on 'Data on Police Organizations in India', Published by Bureau of Police Research &Development New Delhi.2015.
4. Shinha Ranu, AN ENQUIRY INTO THE STATUS OF WOMEN IN POLICE SERVICE : A COMPARATIVE STUDY OF WOMEN POLICE OFFICERS IN INDIA AND USA Thesis submitted to JNU -2003.
5. Rough Road to Equality -Women Police in South Asia-2015, Published by CHRI Organization New Delhi.
6. Shamim Ali, 'Women Police and Social Change' 1989.



Scanned by CamScanner